## उलटतपास गैरअर्जदारातर्फे श्री. व्ही. व्ही. साकरकार वकीलसाहेब.

१०. सदर प्रकरणामध्ये तक्रारदाराच्या वकीलांनी नि. क्रं. सी—२० वरील दस्त क्रं. १, ४, ५ आणि ९ हे मान्य केलेले आहेत, त्यामुळे दस्त क्रं. १ यांस **नि. क्रं सी—२४** देण्यात येते. दस्त क्रं. ४ यांस **नि. क्रं सी—२५** देण्यात येते. दस्त क्रं. ५ यांस **नि. क्रं सी—२६** देण्यात येते व दस्त क्रं. ९ यांस **नि. क्रं सी—२७** देण्यात येते.

११. माझी नियुक्ति दि. १६/०१/२०१२ रोजी सेल्स एक्सेक्युटीव्ह म्हणून झाली व मला सुरूवातील रू. १०,०००/— पगार मिळत होता. मला सेवेमध्ये दि. १६/०७/२०१२ रोजी नियमित/कायम करण्यात आले. माझी प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर मध्ये माझे वेतनामध्ये वाढ होते. माझे वेतनाची वाढ ही माझे कार्यशैलीवर अवलंबून असते. माझे मुख्य कार्यालय वरळी, मुंबई येथे आहे. माझे वरिष्ठ श्री. प्रभाकर कुमार सिंग यांच्या अधिपत्याखाली मी काम करत होतो. हे मला आठवत नाही की, मला बिझनेस एक्सेक्युटीव्ह म्हणून गैरअर्जदारांनी कधी नियुक्त केले. मला बिझनेस एक्सेक्युटीव्ह म्हणून नियुक्त केल्यानंतरचा पगार किती मिळत होता हे मला आठवत नाही, मात्र मला कामावरून कमी केल्यानंतरचा पगार रू. ६२,५००/— प्रति माह व रू. ८,४९,०००/— प्रति वर्षी गैरअर्जदाराकडून मिळत होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे काम व्हॅक्सीन मॉडेलमध्ये गैरअर्जदाराकडे होते. हे म्हणणे खरे नाही की, व्हॅक्सीन मॉडेलमध्ये काम करणे हे सेल्स मेडीकल रिप्रेझेंन्टेटीव्ह पेक्षा जास्त जबाबदारीचे असते. हे म्हणणे खरे आहे की, मी व्हॅक्सीनचे प्रत्येक डॉक्टरकडे प्रमोशन करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, व्हॅक्सीनच्या प्रमोशनसाठी डॉक्टरांच्या मिटींग्ज बोलविणे, त्या मिटींगमध्ये त्यांना समजावून सांगणे इत्यादी कामे मी करत असतो. डॉक्टरच्या मिटिंगसंदर्भात माझे वरिष्ठ त्यासंदर्भीचे रेकॉर्ड ठेवत होते. हे म्हणणे खरे नाही की, वरील सर्व बाबी मी न्यायालयात खोटे सांगत आहे व माझी सबाबदारी मी टाळत आहे.

१२. व्हॅक्सीनची डॉक्टरांना माहिती दिल्यानंतर ते व्हॅक्सीन काही डॉक्टर स्वत: खरेदी करायचे व काही डॉक्टर औषधांच्या दुकानात उपलब्ध करण्यास सांगायचे. हे म्हणणे खरे नाही की, व्हॅक्सीन दिल्यानंतर त्यांच्या परिणामाची व किती पेशंटला दिली व त्यांच्या गुणवत्तेची प्रत्येक डॉक्टरकडून माहिती घेवून त्यांसदर्भात कंपनीला कळविण्याची जबाबदारी माझी आहे. व्हॅक्सीनचा परिणाम व त्याची गुणवत्ता कशी आहे ह्याची माहिती कंपन्यांना कशी कळते याबद्दल मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हे ही न्यायालयासमोर खोटे बोलत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कंपन्याच्या विविध स्कीम डॉक्टरांना दिल्या जातात. हे म्हणणे खरे नाही की, व्हॅक्सीनचे कोणते कोणते पॅरामिटर्स आहेत व त्यासंबंधीचा मागोवा घेणे हे माझे काम आहे. हे म्हणणे खरे नाही की, कंपनीने दिलेल्या शेड्युल प्रमाणे व्हॅक्सीन दिलेली आहे की नाही हे पाहणे माझी जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरील प्रश्नांची माझी जबाबदारी असून ती टाळण्यासाठी वरील उत्तरे मी दिली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, कंपनीने माझी काय कर्तव्य आहेत, हे मला कळविण्यात आलेले होते.

गैरअर्जदारांच्या विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

**समक्ष**

स्वा/—
**(डी. एस. पाईकराव)**
**न्यायाधिश,**
**कामगार न्यायालय, अकोला.**

**दिनांकः— १४/११/२०२५.**